नागपूर जिल्हा परिषदेतील निवडणूक विभाग तसेच धुळे, अकोला व नागपूर जिल्हयाअंतर्गत पंचायत समित्यांमधील रिक्त पदांच्या पोट निवडणुकीचा कार्यक्रम-जुलै-ऑगस्ट २०२४

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्र.रानिआ/जिपपंस/२०२४/प्र.क्र.०८ /का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १९ जुलै २०२४.

प्रति,
जिल्हाधिकारी,
धुळे, अकोला व नागपूर

विषय:- नागपूर जिल्हा परिषदेतील निवडणूक विभाग तसेच धुळे, अकोला व नागपूर जिल्हयाअंतर्गत पंचायत समित्यांमधील रिक्त पदाच्या पोट निवडणुकीचा कार्यक्रम-२०२४

संदर्भ:- राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/जिपपंस-२०२४/प्र.क्र.०८/का.७, दि. ०२/०७/२०२४.

महोदय/महोदया,

राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त संदर्भांकित दि.०२/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये नागपूर जिल्हा परिषद ०१ निवडणूक विभाग तसेच धुळे, अकोला व नागपूर जिल्हयाअंतर्गत ०४ पंचायत समित्यांमधील रिक्त पदांच्या पोट निवडणुकीकरिता मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम देण्यात आला असून दि.१९/०७/२०२४ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

२. आता या पत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट-२ व ३ मध्ये नमूद करण्यात आलेल्या रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी परिशिष्ट-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात येत असून सदर कार्यक्रम संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात यावा.

३. सदर निवडणूक विभाग / निर्वाचक गणाच्या पोट निवडणुकीची आचारसंहिता निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. सदर आचारसंहिता ही निवडणूक होणाऱ्या संबंधित निवडणूक विभाग / निर्वाचक गणाच्या क्षेत्रात लागू राहील. मात्र पोटनिवडणूक असलेल्या निवडणूक विभाग / निर्वाचक गणाच्या मतदारांवर प्रभाव

2

पडेल, अशा तऱ्हेचे कोणतेही धोरणात्मक निर्णय, कोणतीही कृती /घोषणा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था, खासदार, आमदार किंवा इतर कोणत्याही पदाधिकाऱ्यांना करता येणार नाही. याप्रकरणी आयोगाचे आचारसंहितेचे दि. १४/१०/२०१६ चे एकत्रित आदेशाचे पालन करावे.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम,१९६१ मधील कलम १२अ मधील तरतुदीनुसार निवडणूक विभाग व निर्वाचक गणातील राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या इच्छूक व्यक्तींनी नामनिर्देशनपत्रासोबत जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

५. उपरोक्त रिक्त पदांच्या पोटनिवडणुकीसंदर्भात कोणत्याही न्यायालयात याचिका दाखल असल्यास त्याबाबत खातरजमा करुन न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच मा.न्यायालयाचे कोणत्याही रिट याचिकामध्ये स्थगिती आदेश असल्यास/प्राप्त झाल्यास निवडणूक कार्यक्रम स्थगित करण्यात यावा व तसे आयोगास अवगत करावे.

६. राज्य निवडणूक आयोगाच्या दि.०२/०१/२०१७ रोजीच्या आदेशातील निवडणूक पूर्वतयारी बाबतच्या सविस्तर सूचनांनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. (प्रत संलग्न)

७. जिल्हा परिषद निवडणूक विभाग /पंचायत समिती निर्वाचक गणातील रिक्त पदाच्या पोट निवडणुकीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

आपला,

सहपत्र-परिशिष्ट-१, २ व ३

(सुरेश काकाणी) १८.०८.२०२१

सचिव

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-

१) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
३) प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम इमारत, मर्झबान पथ, मंत्रालय, मुंबई-१
यांना कळविण्यात येते की, जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या पोट निवडणुकीसाठी आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावे.

४) मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
५) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६) विभागीय आयुक्त, नाशिक, अमरावती व नागपूर
७) जिल्हा पोलिस अधिक्षक, धुळे, अकोला व नागपूर
८) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नीरोड, मुंबई-४
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धुळे, अकोला व नागपूर
१०) उप सचिव, संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
११) उप आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांना मतदान साहित्याच्या उपलब्धतेसंदर्भातील पुढील उचित कार्यवाहीसाठी.
१२) महिती जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१३) राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनेलवरील सर्व वकील
१४) राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
१५) निवड नस्ती (कार्यासन-७), राज्य निवडणूक आयोग

| राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/जिपपंस-२०२४/प्र.क्र.०८/का.७, दि.१९/०७/२०२४ सोबतचे सहपत्र |
|---|

परिशिष्ट-१

**नागपूर जिल्हा परिषदेतील ०१ निवडणूक विभाग तसेच धुळे, अकोला व नागपूर जिल्हयाअंतर्गत ०४ पंचायत समित्यांमधील ०४ निर्वाचक गणातील रिक्त पदांच्या पोट निवडणुकीचा कार्यक्रम**

| अ.क्र. | टप्पे | कार्यक्रमाचा दिनांक |
|---|---|---|
| १ | निवडणुकीच्या तारखांची सूचना व निवडणुकीचा कार्यक्रम जिल्हाधिकाऱ्यांनी प्रसिध्द करण्याची तारीख | मंगळवार, २३ जुलै २०२४ |
| २ | संकेतस्थळावर भरण्यात आलेले नामनिर्देशनपत्र निर्वाचन अधिकाऱ्यांनी स्विकारण्याचा कालावधी | मंगळवार, २३ जुलै २०२४ (सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) ते सोमवार २९ जुलै २०२४ (सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) **(रविवार दि.२८/०७/२०२४ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत.)** |
| ३ | नामनिर्देशनपत्राची छाननी व त्यावर निर्णय देणे | मंगळवार, ३० जुलै, २०२४ (सकाळी ११ वाजल्यापासून) |
| ४ | वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | मंगळवार, ३० जुलै, २०२४ ( छाननीनंतर लगेचच ) |
| ५ | नामनिर्देशनपत्राचा स्विकार करण्याबाबत किंवा ते नामंजूर करण्याबाबतचा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाविरुध्द जिल्हा न्यायाधिशांकडे अपिल करण्याची शेवटची तारीख | शुक्रवार, ०२ ऑगस्ट २०२४ |
| ६ | जिल्हा न्यायाधिशांनी अपिलावर सुनावणी व निकाल देण्याची संभाव्य शेवटची तारीख | सोमवार, ०५ ऑगस्ट २०२४ |
| ७ | जिल्हा न्यायाधिशांनी अपिल निकालात काढल्यावर वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | सोमवार, ०५ ऑगस्ट २०२४ |

| | | |
|---|---|---|
| ८ | उमेदवारी मागे घेणे<br>(अ) जेथे अपील नाही तेथे | सोमवार, ०५ ऑगस्ट २०२४<br>(सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) |
| | (ब) जेथे अपील आहे तेथे | बुधवार, ०७ ऑगस्ट २०२४<br>(सकाळी ११ ते दु.३ पर्यंत) |
| ९ | निवडणूका लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व निशाणी वाटप-<br>(अ जेथे अपील नाही तेथे | सोमवार, ०५ ऑगस्ट २०२४<br>(दुपारी ३.३० नंतर) |
| | (ब) जेथे अपिल आहे तेथे | बुधवार, ०७ ऑगस्ट २०२४<br>( दुपारी ३.३० नंतर) |
| १० | मतदान केंद्राची यादी प्रसिध्द करणे | सोमवार, ०५ ऑगस्ट २०२४ |
| ११ | मतदानाची तारीख | रविवार, ११ ऑगस्ट २०२४<br>(सकाळी ७.३० ते ५.३० पर्यंत) |
| १२ | मतमोजणी तारीख | सोमवार, १२ ऑगस्ट २०२४<br>(सकाळी १०.०० पासून) |
| १३ | निवडून आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करणे | बुधवार, १४ ऑगस्ट २०२४ पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

१८.०७.२०२४

( सुरेश काकाणी )
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## परिशिष्ट-२

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | तालुका | निवडणूक विभागाचा क्रमांक व नांव |
|---|---|---|---|
| १ | नागपूर | पारशिवनी | २१-टेकाडी (को.ख.) |

## परिशिष्ट-३

| अ.क्र. | जिल्हा | पंचायत समितीचे नाव | निर्वाचक गणाचा क्रमांक व नांव |
|---|---|---|---|
| १ | धुळे | धुळे | ८४-बोरीस |
| २ | अकोला | बाळापूर | ७७-बटवाडी बु. |
| ३ | नागपूर | काटोल | ११-पारडसिंगा |
| ४ | नागपूर | रामटेक | ४५-बोथीया पालोरा |

राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका- फेब्रुवारी २०१७ निवडणुकीची पूर्वतयारी...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्रमांक : रानिआ/जिपपस-२०१६/प्र.क्र.५१/का-७,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०२ जानेवारी, २०१७

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे,पालघर,
धुळे, नंदूरबार,अकोला, वाशिम, भंडारा व गोंदिया वगळून)

विषय:- जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूक- फेब्रुवारी २०१७ निवडणुकीची पूर्वतयारी...

संदर्भ:- १) सचिव राज्य निवडणूक आयोग यांचे अर्धशासकीय पत्र क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.१९/का.६, दि.१९/०१/२०१६
२) आयोगाचे पत्र क्र.रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.१६/का.७, दि.१८/०८/२०१६, दि. ०७/१०/२०१६, दि. ०२/११/२०१६, दि.०९/११/२०१६ व दि.२०/११/२०१६
३) आयोगाचे पत्र क्र. रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.२९/का.७, दि.२२ नोव्हेंबर, २०१६

महोदय/महोदया,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण यांची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. ही जबाबदारी लक्षात घेता राज्य निवडणूक आयोगाने माहे मार्च-२०१७ मध्ये मुदती संपणाऱ्या २६ जिल्हा परिषदा व २९६ पंचायत समितींच्या सार्वत्रिक निवडणुका वेळेवर घेण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना / आदेश दिलेले आहेत :-

(i) निवडणुकीच्या पुर्वतयारीबाबत:- मुख्य सचिवांना संदर्भाधीन दि.१९/०१/२०१६ रोजी दिलेले अर्धशासकीय पत्र

(ii) प्रभाग रचनेबाबत:- आयोगाचे संदर्भाधीन दि.१८/०८/२०१६, दि.०७/१०/२०१६, दि.०२/११/२०१६, दि.०९/११/२०१६ व दि. २०/११/२०१६ अन्वये देण्यात आलेले प्रभाग रचना व आरक्षण सोडतीचे कार्यक्रम

(iii) मतदार यादीच्या प्रभागनिहाय विभाजनाबाबत :- आयोगाचे संदर्भाधीन दि.२२/११/२०१६ च्या आदेशान्वये देण्यात आलेला मतदार यादी विभाजनाचा कार्यक्रम

२. आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.२९/का.७, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१६ अन्वये दि. ०५/०१/२०१७ रोजी ( किंवा भारत निवडणूक आयोग ज्या तारखेला प्रसिध्द करेल ती तारीख) अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी प्रभागनिहाय विभागून वापरावयाची आहे.

३. २६ जिल्हा परिषदा व २९६ पंचायत समित्यांचा निवडणूक कार्यक्रम आयोगाकडून स्वतंत्ररित्या जाहीर करण्यात येईल.

४. मात्र या निवडणूकांच्या पूर्वतयारीबाबत पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

५ **आदेश**

५.१ उपरोक्त निवडणूका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची सर्व जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त यांची राहील. लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्यावेळी जी दक्षता व काळजी घेण्यात येते, ती सर्व दक्षता व काळजी या निवडणुकांमध्येदेखिल घेणे बंधनकारक आहे. तरी संबंधित जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांनी त्याप्रमाणे नियोजन करावे.

५.२ या निवडणुकांसाठी जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

**(अ) मतदान केंद्राबाबत**

(i) राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक-रानिआ-२०१५/प्र.क्र.०९/प्रकल्प कक्ष, दि. २७/०५/२०१५ च्या पत्रातील सूचनांनुसार जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांची संख्या १२०० ते १४०० मतदार प्रती मतदान केंद्र एवढी ठेवण्यात यावी. तसेच उक्त पत्रातील सूचना व पत्र क्र.रानिआ/ मनपा२०१६ /प्र.क्र.४/का.५, दिनांक ०९/०३/२०१६ नुसार जिल्हा परिषद व पंचायत समित्यांकरिता निश्चित करण्यात येणाऱ्या मतदान केंद्राबाबत कार्यवाही करावी. त्यामधील मार्गदर्शक तत्वानुसार मतदान केंद्राचे स्थान तसेच मतदान केंद्रनिहाय मतदारांची संख्या निश्चित करावीत.

(ii) संवेदनशील व अतिसंवेदनशील केंद्रांची यादी निश्चित करुन त्याबाबत योग्य ती उपाययोजना करावी.

(iii) मतदान केंद्राची प्रत्यक्ष पाहणी करुन सदर मतदान केंद्रावर आवश्यक त्या सोई-सुविधा उदा. सुव्यवस्थित खोल्या, शौचालय, पिण्याचे पाणी, वीज पुरवठा, रॅम्प, सुरक्षा भिंत इ. सुविधा असल्याबाबत खात्री करावी.

(iv) आपल्या जिल्हयात आदर्श मतदान केंद्र तयार करण्याकामी नाविन्यपूर्ण कल्पना राबवाव्यात व किमान / १० टक्के काही मतदान केंद्र ही त्या धर्तीवर तयार करण्यात यावीत.

(v) निवडणुकीसाठी वापरण्यात येणारी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे तयार करावी व ती सुरक्षित ठेवण्यासाठी स्ट्रॉंग रुमची व्यवस्था करावी.

(vi) कोणत्याही कारणास्तव मतदानाच्या दिवशी व मतमोजणीच्या दिवशी संबंधित ठिकाणी वीज पुरवठा खंडीत होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**(ब) अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्तीबाबत**

(i) जिल्हयातील पंचायत समित्यांची संख्या लक्षात घेऊन प्रत्येक पंचायत समितीस एक याप्रमाणे उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्याची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तसेच तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्याची सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करावी. विभागीय आयुक्त यांनी आवश्यकतेप्रमाणे अधिकारी उपलब्ध करुन द्यावे. हे करीत असताना राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०१६/प्र.क्र.३६/का.७, दिनांक २६/१२/२०१६ अन्वये दिलेल्या सूचना लक्षात घ्याव्यात. विभागीय आयुक्तांनी उपलब्ध करुन दिलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती जिल्हाधिकारी करतील.

(ii) जिल्हयामधील पंचायत समितीनिहाय मतदान केंद्रांची संख्या लक्षात घेऊन जिल्हाधिकारी यांनी मतदान केंद्रांसाठी पुरेसे अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्त्या कराव्यात. यावेळी किमान १० टक्के कर्मचारीवृंद अधिक्याने नेमण्यात येईल याची काळजी घ्यावी. तसेच निवडणूक कामासाठी आवश्यक इतर कर्मचारीवृंद यांची सेवा अधिग्रहीत करावी.

पोलिस यंत्रणेशी समन्वय साधून सुरक्षिततेच्यादृष्टीने आवश्यक पोलीस कर्मचारीवृंदाची नियुक्ती करण्याबाबत निदेशित करावे.

(iii) निवडणुकीचे काम करण्यासाठी आवश्यक ते अधिकारी/कर्मचारी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्र.एसईसी-१०९५/३०६/डेस्क-३, दि. ०२/०३/१९९५ च्या अन्वये अधिग्रहित करण्यात यावेत.

(iv) निवडणुकीच्या कालावधीत निवडणुकीशी संबंधित अधिकारी / कर्मचारी हे राज्य निवडणूक आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर राहतील. जर या अधिकारी / कर्मचाऱ्यांनी कामामध्ये निष्काळजीपणा अथवा कुचराई केली तर त्यांच्याविरुध्द निलंबनासह सर्व प्रकारची प्रशासकीय कारवाई (Disciplinary Action with Suspension) करण्याचे सर्व अधिकार राज्य निवडणूक आयोगास आहेत. तरी आयोगाच्यावतीने जिल्हाधिकारी यांनी आयोगाचे आदेश क्र. रानिआ २००६/प्र.क्र.१४/का.५, दिनांक ०२/०८/२००६ लक्षात घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

**(क) अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाबाबत :-**

जिल्हाधिकारी यांनी निवडणूक कामासाठी नियुक्त केलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांना आवश्यक त्या सर्व विषयांवर योग्य ते प्रशिक्षण दयावे. उदा. निवडणूक निर्णय अधिकारी तसेच सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांना त्यांच्या निवडणूक विषयक कामकाजाची ओळख व जबाबदारीची जाणीव करुन देण्याच्या उद्देशाने सर्व कायदेशीर तरतुदी तसेच आयोगाच्या आदेशांबाबतची माहिती द्यावी तसेच खालील नमूद विषयांबाबतचे विशेष प्रशिक्षण दयावे:-

(i) नामनिर्देशपत्र व शपथपत्रांचे संगणकीकरण.

(ii) आयोगास विविध टप्प्यांवर दयावयाच्या अहवालाची पध्दती (संगणकीय प्रणाली, True Voter app. व्हॉटस् ॲप इ. चा वापर)

(iii) आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत

(iv) आर्थिक बळाचा दुरुपयोग व मतदारांना देण्यात येणाऱ्या प्रलोभनांवर अंकुश ठेवण्यासाठी करावयाची उपाययोजना.

(v) पेड न्यूज, पेड सोशल कमेंट, सोशल मीडीया इत्यादीवर लक्ष ठेवण्यासाठी उपाययोजना

(vi) आयोगाने निश्चित केलेल्या पध्दतीनुसार अद्ययावत माहिती वेळेवर पाठविणे.

(vii) मतदान केंद्राध्यक्ष व इतर अधिकाऱ्यांसह सर्वांना मतदान यंत्र हाताळण्याबाबतचे प्रशिक्षण इत्यादी.

**(ड) मतमोजणी :-**

मतमोजणीकरिता राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र.रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का-५, दि.२१ डिसेंबर, २००९ व दि.२९ मार्च, २०१० नुसार कार्यवाही करण्यात यावी. मतमोजणीच्यावेळी अनावश्यक गर्दी/गोंधळ होणार नाही यासाठी योग्य ती उपाययोजना करावी.

मतमोजणीकरिता राज्य निवडणूक आयोगाकडून तयार करण्यात आलेल्या संगणकीय प्रणालीत मतमोजणीची आकडेवारी भरणे आवश्यक असून संगणक प्रणालीतूनच तयार होणारे विजयी उमेदवारांचे प्रमाणपत्र ( Colour Print) काढल्यानंतरच निकाल घोषित करावा व प्रमाणपत्र सही करुन वितरण करावे.

**६. नामनिर्देशनपत्र, शपथपत्र, इतर कागद पत्रे सादर करण्याच्या प्रक्रियेच्या संगणकीकरणाबाबत.**

६.१ उमेदवारांना त्यांचे नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी खालील कागदपत्रे सादर करावी लागतात :-

(अ) नामनिर्देशनपत्र

(ब) मत्ता व दायित्व तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबतचे शपथपत्र

(क) आवश्यक प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती, व

(ड) पक्षातर्फे निवडणूक लढवीत असल्याबाबत "नमुना-२अ" व "नमुना-२ब"

(इ) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र - (जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास जात पडताळणी समितीकडे अर्ज सादर केल्याची पावती व हमीपत्र)

६.२. राज्य निवडणूक आयोगाने पहिल्या दोन बाबींकरिता म्हणजेच उमेदवारांना नामनिर्देशपत्र व शपथपत्र सहजरितीने भरता यावे यासाठी महाऑनलाईनच्या मदतीने एक सॉफ्टवेअर तयार केलेले आहे. सर्व संभाव्य उमेदवारांनी सॉफ्टवेअरद्वारे नामनिर्देशनपत्र व शपथपत्र भरणे आवश्यक आहे. त्यांनी http://panchayatelection.maharashtra.gov.in या वेबसाईटवर जाऊन त्यामध्ये स्वत:ची नोंदणी करुन (Register) घ्यावी व नामनिर्देशनपत्रामध्ये तसेच शपथपत्रामध्ये माहिती भरावी. (सदरची माहिती सेव्ह करुन ठेवता येऊ शकते. आवश्यक असल्यास दुरुस्ती करुन) त्याचे प्रिंटआऊट काढून त्यावर स्वाक्षरी करुन ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे विहित वेळेत व विहित पध्दतीने दाखल करावे. अशाप्रकारे भरलेला व स्वाक्षरी केलेला नामनिर्देशन पत्राचा अर्ज नामनिर्देशन पत्र म्हणून ग्राहय धरण्यात येईल.

६.३ सर्व उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व शपथपत्र इ. भरण्यात अडचण येऊ नये म्हणून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी आवश्यकतेप्रमाणे एक किंवा त्यापेक्षा जास्त मदत कक्षांची (Help Desk) स्थापना करावी व हेल्प डेस्क सांभाळणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य ते प्रशिक्षण द्यावे. तसेच सायबर कॅफे व सी.एफ.सी. (Community Facilitation Center) ची मदत घेण्यात यावी.

६.४ उमेदवारांनी नामनिर्देशपत्रासोबत सादर करावयाचे शपथपत्र संगणकाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नमुन्यात भरुन त्याचे प्रिंट आऊट घेऊन स्वतःची स्वाक्षरी करुन आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यासमोर दृढकथन करुन ते निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचे आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या क्र. रानिआ/मनपा-२०१४/का-०५, दि.८/१/२०१५ च्या आदेशानुसार अशी शपथपत्रे स्टॅम्प पेपरवर सादर करण्याची आवश्यकता नाही.

६.५ राखीव प्रभागातून सदस्य पदाची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यांनी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची पोच पावती नामनिर्देशन पत्रासोबत सादर करण्याची त्यांना मुभा देण्यात आली आहे. अशा उमेदवारांनी निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची निवड भूतलक्ष्मी प्रभावाने रद्द करण्याबाबत अधिनियमात तरतूद आहे. (सन २०१६ महाराष्ट्र अधिनियम क्र.२१, दि. ०७ मे, २०१६ ) या संदर्भात उमेदवाराकडून नामनिर्देशनपत्रासोबत विहित केलेले याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे.

६.६. आवश्यक ती प्रमाणपत्रे व पक्षातर्फे निवडणूक लढवीत असल्याबाबत पक्षाचा अध्यक्ष, सचिव किंवा सूचना पाठविण्यास प्राधिकृत केलेल्या पक्षाच्या अन्य पदाधिकाऱ्याने शाईने अथवा बॉलपेनने स्वाक्षरी केलेले "नमुना-२अ"व "नमुना-२ब" सादर करावीत. सदरचे नमुने व जात वैधता प्रमाणपत्राकरीता हमीपत्र ही कागदपत्रे स्कॅन (Scan) करुन अपलोड किंवा संगणकाच्या मदतीने भरु नये.

६.७ उमेदवारास त्याची उमेदवारी मागे घ्यावयाची असल्यास त्याकरीता महाराष्ट्र जिल्हा परिषदा निवडणूक नियम १९६२ मधील नियम-२१ व महाराष्ट्र पंचायत समित्या निवडणूक नियम १९६२ मधील नियम-२० नुसार घ्यावयाचा अर्ज विहित पध्दतीने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचा आहे. उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज संगणकाद्वारे भरावयाचे नाहीत अथवा ई-मेलद्वारे देता येणार नाहीत.

६.८ नामनिर्देशन पत्र आणि शपथपत्राचा नमुना खालील वेब साईटवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे :- http/panchayatelection.maharashtra.gov.in या आज्ञावलीच्या वापराबाबत काही अडचणी आल्यास आयोगाच्या संगणकीकरण शाखेतील नोडल अधिकारी व महाऑनलाईनचे प्रतिनिधी यांच्याशी दूरध्वनी व ई-मेल वर संपर्क साधावा.

७. **नामनिर्देशनपत्रासोबत जोडावयाच्या शपथपत्रातील कोणत्याही रकान्यात माहिती न भरल्यास :-**

आयोगाच्या क्र. रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.५/का.०६, दि. २७/०३/२०१५ च्या पत्रासोबतच्या भारत निवडणूक आयोगाच्या आदेश क्र. ५६७/३/२०१३-एसडीआर, दि. ३०/०९/२०१३ मध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कार्यवाही करावी. याबाबत सर्व राजकीय पक्षांना माहिती देण्याकरीता आवश्यक त्या उपाययोजना संबंधित जिल्हाधिकारी यांनी कराव्यात.

८. **नामनिर्देशनपत्र मागे घेणे तसेच बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारास विजयी घोषित करण्याबाबत :-**

नामनिर्देशनपत्र भरण्याच्यावेळी अनेक उमेदवारांनी अर्ज भरुनदेखिल एक उमेदवार वगळता अन्य सर्व उमेदवार ज्यावेळी अर्ज मागे घेतात, त्यावेळी सदर उमेदवाराने इतर उमेदवारांवर दबाव आणून उमेदवारी अर्ज मागे घेण्यास लावले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे असे प्रसंग घडल्यास आयोगास सविस्तर अहवाल तात्काळ पाठवावा व आयोगाने मान्यता दिल्यानंतरच त्या उमेदवाराला विजयी घोषित करावे. याबाबत आयोगाचे क्र.रानिआ/मनपा२००४/प्र.क्र.३७/का.५, दि.२३/१२/२००४ च्या आदेशाचे पालन करावे.

९. **आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी :-**

(i) जिल्हा परिषदा / पंचायत समितींच्या सार्वत्रिक निवडणुका असल्याने संपूर्ण जिल्ह्यामध्ये आचारसंहिता लागू राहील. मात्र याबाबत स्पष्ट करण्यात येते की, जिल्हा परिषद क्षेत्राबाहेरील म्हणजेच त्या जिल्हयातील नगर पंचायत/ नगर परिषद वा महानगरपालिका क्षेत्रात नेहमीप्रमाणे सर्व कामे व अनुषंगिक बाबी करण्यावर कोणतेही निर्बंध असणार नाहीत. परंतु जिल्हा परिषदेतील मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणारी कोणतीही कृती/घोषणा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था वा मंत्री, खासदार, आमदार वा कोणत्याही पदाधिकाऱ्यांना करता येणार नाही.

(ii) आचारसंहितेचा कालावधी - राज्य निवडणूक आयोग ज्यावेळी निवडणुकीचा कार्यक्रम घोषित करेल त्यावेळेपासून आचारसंहिता लागू होईल व ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील.

(iii) याबाबत आयोगाचे क्र. रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३१/का.६, दि.१४/१०/२०१६ मधील तरतुदींचे सर्वतोपरी पालन होईल याची संबंधितांनी दक्षता घ्यावी. आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत या आदेशात नमूद नसलेली काही अपवादात्मक परिस्थिती उद्भवल्यास जिल्हाधिकारी यांनी आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव मार्गदर्शनाकरिता विभागीय आयुक्त यांच्याकडे पाठवावा. जर विभागीय आयुक्त यांना आवश्यक वाटल्यास तरच प्रस्ताव मार्गदर्शनार्थ राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवावा. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आयोगाच्या कार्यालयाकडे आचारसंहितेप्रकरणी परस्पर संदर्भ करु नये.

१०. **खर्चावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे व मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी वस्तुंच्या वाटपावर अंकुश ठेवणे :-** निवडणुकीसाठी आचारसंहिता कालावधीत मतदारांना प्रभावित करण्याकरिता तसेच प्रलोभन देण्यासाठी उमेदवारांकडून तसेच राजकीय पक्षांकडून नवनवीन उपाययोजना करण्यात येतात. याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय, तसेच मा. उच्च न्यायालयाच्या विविध निकालांमध्ये चिंता व्यक्त करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने भारत निवडणूक आयोगाकडून आचारसंहितेबाबत काही उपाययोजना करण्यात येतात. त्याचधर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही दक्षता घेण्यात यावी.

१०.१ सन २०१० महाराष्ट्र अधिनियम क्र.१६, दि.१० मे, २०१० अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी विहित रितीने खर्चाचे हिशोब सादर न करणाऱ्या उमेदवारांना अनर्ह घोषित करण्याची तरतूद करण्यात आली असून सदरचे अधिकार आयोगाचे दि.१९/११/२०१० च्या आदेशान्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

१०.२ राज्य निवडणूक आयोगाचे सद्यस्थितीतील आदेश क्रमांक - रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१७/का.५, दिनांक ३० जुलै, २०११ किंवा प्रत्यक्ष निवडणुकीच्यावेळी अस्तित्वात असलेल्या आदेशान्वये उमेदवारांने करावयाच्या खर्चाची मर्यादा विहित केलेली आहे.

१०.३ राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.१०/का.०६, दि.१०/०८/२०१५ नुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने दैनंदिन खर्चाचा हिशोब तसेच निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत एकत्रित खर्चाचा तपशील संबंधित

जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी प्राधिकृत करतील अशा उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याकडे सादर करावयाचा आहे.

१०.४ राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/२०१६/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष, दि.१५ ऑक्टोबर, २०१६ व दि.२५ ऑक्टोबर, २०१६ अन्वये उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करण्याची कालमर्यादा व रित विहित केली आहे. उमेदवाराने निवडणुकीदरम्यानं केलेल्या खर्चाबाबत सादर करावयाची विवरणपत्रे व शपथपत्रांसदर्भातील आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ-२०१६/प्र.क्र.१३/का.सं.कक्ष, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ पहावेत.

१०.५ निवडणुकांकरिता पक्षाने केलेला खर्च संबंधित पक्षांच्या उमेदवारांमध्ये विभाजित करणेकामी आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र.१७/का-५, दि.२८ डिसेंबर, २००६ पहावेत. तसेच राजकीय पक्षाने निवडणुकीदरम्यान उमेदवारांवर केलेल्या खर्चाबाबतची कागदपत्रे/विवरणपत्रे/शपथपत्रे इ. संदर्भातील आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/रापनों२०१६/ प्र.क्र.०४/का.११, दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ व आयोगाचे आदेश क्रमांक- रानिआ/२०१६/ उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष, दि.२५ ऑक्टोबर, २०१६ पहावेत.

उपरोक्त सर्व तरतुदी व आदेश सर्व उमेदवार व राजकीय पक्ष यांच्या निर्दशनास आणून दयावेत.

**११. आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व खर्चावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे व मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूंच्या वाटपावर अंकुश ठेवण्यासाठी उपाययोजना :-**

(i) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक निवडणूक संनियंत्रण समिती स्थापन करण्यात यावी. यामध्ये खालीलप्रमाणे सदस्य असतील :-

| | अनिवार्य सदस्य | आवश्यकतेप्रमाणे सदस्य |
|---|---|---|
| १ | जिल्हा पोलिस अधिक्षक | महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | महाराष्ट्र राज्य प्रादेशिक परिवहन कार्यालय |
| ३ | आयकर विभागाचे अधिकारी | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| ४ | विक्रीकर विभागाचे अधिकारी | विद्यापिठे |
| ५ | अबकारी विभाग | जिल्हा माहिती अधिकारी (DIO), इत्यादी |
| ६ | बँकेचे वरिष्ठ अधिकारी | |

(ii) या समितीवर आवश्यकतेप्रमाणे इतर अधिकारी घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

(iii) जिल्हाधिकारी यांनी योग्य त्या अधिकाऱ्याची **समिती सचिव** म्हणून नियुक्ती करावी.

(iv) जिल्हा परिषदेची निवडणूक असलेल्या जिल्हयांमध्ये महानगरपालिकेचीही निवडणूक असल्यास, जिल्हाधिकारी यांनी संबंधित महानगरपालिका आयुक्त यांच्याशी समन्वय साधावा.

**१२. संनियंत्रण समितीने करावयाची कार्यवाही :-**

१२.१ संनियंत्रण समितीने आवश्यक त्या सर्व विषयावर शास्त्रोक्त आराखडा तयार करुन योग्य ती कार्यवाही करावी उदा.:-

(i) कायदा व सुव्यवस्था राखणे -

प्रतिबंधात्मक उपाययोजनांसह (संवेदनशील, नक्षलग्रस्त, इत्यादी भागांसाठी विशेष व्यवस्था)

(ii) आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे

(iii) मतदारांवर प्रभाव टाकण्याकरिता देण्यात येणाऱ्या वस्तूंच्या जसे- मद्य (Liquor), पैसा इत्यादीच्या वाटपावर अंकुश ठेवणे.

(iv) प्रत्येक उमेदवार व राजकीय पक्ष यांनी खर्चाबाबतची व्यवस्थित माहिती वेळेवर सादर करणे.

(v) रोख रकमांच्या ने-आण संदर्भात लक्ष ठेवणे. त्यासाठी सर्व महत्वाच्या ठिकाणी उदा. विमानतळ, रेल्वे स्थानक, हॉटेल्स, फार्म हाऊस यांच्यावर नजर ठेवणे.

(vi) अशा सर्व व्यवहार व हालचालीवर जसे - तारण, वित्तीय हवाला दलाल (Pawn Brokers, Financial Brokers, Hawala Agents) लक्ष ठेवणे.

(vii) बँकांमार्फत होणाऱ्या मोठया व संशयास्पद आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवणे.

(viii) आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१/का.५, दि. १६/०१/२०१२ प्रमाणे पेड न्यूज, सोशल कमेंट, सोशल मीडिया व इंटरनेट इत्यादींवर लक्ष ठेवणे.

१२.२ यासाठी करावयाच्या आवश्यक उपाययोजना - उदा:-

(i) **व्हिडीओग्राफी सर्व्हेलियन्स पथक**- (Video Surveillance Team)

आचारसंहिता कालावधीमध्ये निवडणुकीच्या क्षेत्रामध्ये घडणाऱ्या महत्वाच्या घटना, मिरवणुका, प्रचार फेऱ्या, सभा अथवा आचारसंहितेच्यादृष्टीने महत्वाच्या घटनांचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात यावे.

अवाजवी खर्चाबाबत किंवा आचारसंहितेचा भंग होणाऱ्या घटनांबाबत या पथकाने निवडणूक निर्णय अधिकारी यांना त्वरित विनाविलंब माहिती उपलब्ध करुन द्यावी. एखादया प्रकरणी व्हिडिओग्राफी सर्व्हेलियन्स पथक - (Video Surveillance Team) उपलब्ध होवू न शकल्यास अधिकारी / कर्मचारी यांनी मोबाईलवर अशा प्रकरणांचे चित्रीकरण करुन निवडणूक निर्णय अधिकारी यांना संबंधित क्लीपसह अहवाल सादर करावा. या क्लीप तपासणीसाठी Video Viewing Team ठेवावी.

(ii) **भरारी पथक** (Flying Squad) :-

पैशाची व मद्याची अवैध मार्गाने वाहतूक, मतदारांना प्रलोभन ठरतील अशा व अन्य संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी भरारी पथक (Flying Squad) तैनात करण्यात यावे. या पथकाने योग्य ती तपासणी करुन आवश्यक त्या वस्तू जप्त कराव्यात व पुढील कायदेशीर कारवाई करावी.

(iii) **चेक पोस्टसाठी पथक** (Static Surveillance Team) :-

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील महत्वाचे नाके, इत्यादी जेथून मद्य / शस्त्रांची अवैध वाहतूक तसेच मतदारांना प्रलोभन ठरतील अशा वस्तूंची / पैशांची वाहतूक होऊ शकते, अशा ठिकाणी चेक पोस्ट तयार करुन वरील पथक नेमावे. या पथकाने योग्य ती तपासणी करुन बेकायदेशीर वस्तू जप्त करुन पुढील कायदेशीर कारवाई करावी. या सर्व गोष्टींचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात यावे.

(iv) **तक्रार निवारण कक्ष** :-

आचारसंहिता भंगाची तक्रार स्विकारण्यासाठी व त्यावर तातडीने कार्यवाही करण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे जिल्हास्तर किंवा स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय कंट्रोल रुम/ कॉल सेंटरची स्थापना करण्यात यावी. या कंट्रोल रुममध्ये उपलब्ध असलेले दूरध्वनी / मोबाईल क्रमांक यांना योग्य ती प्रसिध्दी द्यावी.

(v) वरील तिन्ही पथके व तक्रार निवारण कक्षासाठी जिल्हाधिकारी यांनी पोलिस अधिक्षक यांच्याशी सल्लामसलत करुन योग्य अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती करावी. उदा. नायब नायब तहसिलदार, पोलिस उप निरीक्षक, व्हिडिओग्राफर व शस्त्रधारी पोलिस, इत्यादी तसेच त्यांना त्यांचे काम व्यवस्थित रितीने करता यावे यासाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था (वाहनासह) उपलब्ध करुन द्यावी.

**१३. मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी उपाययोजना :-**

(i) जिल्हा परिषदा / पंचायत समितींच्या निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी ही ७५ ते ८० टक्के असली तरी मतदानाची टक्केवारी वाढविण्याबरोबरच Ethical Voting म्हणजेच निवडणुकीमधील नैतिकता वाढविण्याच्यादृष्टीने राज्य निवडणुक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार सर्व संबंधितांची मदत घेऊन (उदा. विद्यापीठे, महाविद्यालये, उद्योग समूह, अशासकीय संस्था, बँका, हॉटेल, रेस्टॉरन्ट, इ.) मोठया प्रमाणावर जनजागृती मोहीम राबविण्यात यावी.

(ii) जनजागृतीसाठी सर्व प्रकारची उपाययोजना व माध्यमांचा वापर करण्यात यावा. उदा. पारंपारिक व कल्पक योजना, नवीन तंत्रज्ञान, सोशल मीडिया, इत्यादी

**१४. मतदार जनजागृती आणि शिक्षण (Voters awareness & Education)**

१४.१ मा.सर्वोच्च न्यायालयातील सिव्हील अपील क्र.७१७८/२००१ दिनांक ०२ मे, २००२ च्या आदेशानुसार उमेदवारांची माहिती मतदारांना असणे हा मतदारांचा हक्क असल्याबाबत निर्वाळा दिलेला आहे. त्याअनुषंगाने उमेदवाराकडून त्याच्या शैक्षणिक अर्हता, मत्ता व दायित्व तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबत शपथपत्र घेण्यात येते याबाबतचे आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस/२०१५/प्र.क्र.५१/का.७, दिनांक २१ एप्रिल, २०१६ अन्वये विहित केलेल्या नमुन्यात प्राप्त होणारे शपथपत्रास खालीलप्रमाणे प्रसिध्दी देण्यात यावी :-

(i) निवडणूक निर्णय अधिकारी यांचे सूचना फलक

(ii) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था व जिल्हाधिकारी यांच्या संकेतस्थळावर

१४.२ तसेच शपथपत्रातील माहितीच्या (निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय मतपत्रिकेवरील अनुक्रमांकानुसार) गोषवाऱ्यास पुढीलप्रमाणे प्रसिध्दी द्यावी :-

(i) स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरातीद्वारे (शक्यतो)

(ii) प्रत्येक मतदान केंद्रासमोर (मतदारांना सहज वाचता येईल अशा आकाराच्या फ्लेक्स मध्ये)

१४.३ अंतिमत: निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांच्या पूर्वसंमत्तीने त्यांच्याबद्दलची माहिती त्यांच्याच शब्दात सांगणारे २/३ मिनिटांचे व्हिडीओ बाईटस् शक्य असल्यास संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था व जिल्हाधिकारी यांच्या संकेतस्थळावर ठेवावेत.

१४.४ याबाबत सर्व उमेदवारांना समान संधी व न्याय तत्वाने वागणूक दिली जाईल याची दक्षता घ्यावी.

१५. निवडणूक निरीक्षक :-

निवडणूक प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडून निवडणूक निरीक्षक इत्यादी नेमण्यात येणार आहेत. निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणूकांसाठी आवश्यक त्या सर्व व्यवस्था बरोबर, आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी, खर्चावर नियंत्रण, आर्थिक बळाचा दुरुपयोग व मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूंच्या वाटपावर अंकुश, इत्यादी कामांवर त्यांनी लक्ष ठेवावयाचे आहे.

१६. **इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व मार्कर पेन यांच्या वापराबाबत तसेच पितळी सील पुरवठयाबाबत :-**

(i) जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणूका इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर घेण्यात येतील. याबाबत भारत निवडणूक आयोग / राज्य निवडणूक आयोगाच्या मतदान यंत्राद्वारे निवडणूका घेण्यासंदर्भात यथास्थिती कार्यवाही करावी.

(ii) मार्कर पेनने मतदाराच्या बोटाला निशाणी करण्याबाबत आयोगाच्या क्र. रानिआ/मनपा-२०१०/ प्र.क्र.१०/का.०५, दि.१९/११/२०११ च्या पत्रातील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच हे मार्कर पेन वापरण्या योग्य आहे किंवा कसे याची आपल्या स्तरावर खातरजमा करण्यात यावी.

ज्या ठिकाणी ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक/ पोट निवडणूका नुकत्याच पार पाडण्यात आल्या असतील त्याठिकाणी राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२०१२/प्र.क.२४/का.०५, दि.०९/१०/२०१२ अन्वये संबंधित जिल्हाधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

(iii) संबंधित विभागीय आयुक्त यांनी आवश्यकतेनुसार संबंधित जिल्हाधिकारी यांना पितळी सील वेळेत पुरवावेत.

१७. **मतदारांना व्होटर स्लीपचे वाटप करण्याबाबत :-**

लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदारांना फोटो असलेल्या व्होटर स्लीपचे वाटप करण्यात यावे. यासाठी संगणकीकृत मतदार यादी करताना व्होटर स्लीप तयार करावी.

१८. **निवडणूक विषयक अहवाल आयोगास सादर करण्याबाबत :-**

(i) राज्य निवडणूक आयोगाकडून स्वतंत्ररित्या निवडणूक कार्यक्रम देण्यात येईल. त्यानंतर आयोगाने विहित केलेल्या वेळापत्रकानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांनी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करावा.

(ii) निवडणुकीतील टप्पे राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या तारखेस पार पाडावेत. तसेच प्रत्येक टप्पा पार पाडल्यानंतर त्याबाबतची माहिती-

(अ) जिल्हा परिषद व पंचायत समिती वेबसाईवर प्रसिध्द करावी. तसेच

(आ) राज्य निवडणूक आयोगास महाऑनलाईनचे सॉफ्टवेअर, मोबाईल ॲप्स, फॅक्स व ई-मेलद्वारे माहिती तात्काळ पाठवावी.

(iii) राज्य निवडणूक आयोगाच्या दि. ०१/१२/२००४ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार खोटे मतदान करणे, जबरदस्तीने मतदान केंद्राचा ताबा घेणे, मतदान यंत्रावर जबरदस्तीने मते नोंदविणे, वगळलेल्या मतदारांच्या यादीतील लोकांना मतदान करु देणे यासारख्या सर्व महत्वाच्या घटना अथवा गैरप्रकार राज्य निवडणूक आयोगाला ताबडतोब कळविण्याची दक्षता घ्यावी.

(iv) आयोगाने निश्चित केलेल्या पध्दतीनुसार अद्ययावत माहिती वेळेवर पाठवावी. यासंदर्भातील आयोगाचे दि.२४/१०/२०१६ व दि.०९/११/२०१६ चे आदेश पहावेत.

१९. **निवडून आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करण्याबाबत :-**

उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यात आल्यावर संबंधित निवडणूक नियमातील तरतुदीनूसार सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिध्द करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी विहित कालावधीत पूर्ण करावी व त्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा.

२०. इतर

(i) निवडणूक खर्चावर आळा बसविणे आवश्यक असल्याने मा. सर्वोच्च न्यायालयाने सन १९७५ मध्ये खालीलप्रमाणे प्रतिपादित केले आहे.

"…..The object of the provision limiting the expenditure is twofold. In the first place, it should be open to any individual or any political party, howsoever small, to be able to contest an election on a footing of equality with any other individual or political party, howsoever rich and well financed it may be, and no individual or political party should be able to secure and advantage over others by virtue of its superior financial strength…..

The other objective of limiting the expenditure is to eliminate, as far as possible, the influence of big money in the electoral process. If there was no limit on expenditure, political parties would go all out for collecting contributions..... The pernicious influence of big money would then play a decision role in controlling the democratic process in the country".....

(ii) हे सर्व लक्षात घेता निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात होतील याकरिता निवडणुकांशी निगडित सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी कोणत्याही पक्ष व उमेदवार यांची बाजू न घेता (प्रामुख्याने सत्तेमध्ये असलेल्या पक्षाबाबत) निष्पक्षपणे व नियमाप्रमाणे कामे करावीत. तसेच मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणाऱ्या किंवा प्रलोभन देणाऱ्या सर्व योजना किंवा कृत्यांवर लक्ष ठेवून अंकुश ठेवावेत.

(iii) हयाकरिता राज्य निवडणूक आयोगाने बहुतांशी सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेले आहेत.

२१. **मा.सर्वोच्च न्यायालयाच्या खालील निर्णयांकडे जिल्हाधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांचे लक्ष वेधण्यात येत आहे :-**

(अ) श्री. एल.आर.शिवराम गौडा व इतर वि.टी.एम.चंद्रशेखर सिव्हिल याचिका क्र.४२७२/१९९१ "निवडणूक आयोगास उमेदवाराने सादर केलेल्या खर्चाचा तपशील योग्य आहे किंवा कसे हे तपासण्याचे अधिकार आहेत".....

(ब) श्री. एम.एस गिल रिट याचिका क्र. १२९७/१९७७ उद्भवलेली अनपेक्षित परिस्थिती हाताळण्यासाठी "कायदा / आदेश" मध्ये तरतूद नसेल तर परिस्थितीनुरुप सुबुध्दीने निर्णय घेण्याचे अधिकार ) आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ-२०१६/अहाका/ प्र.क्र.१०/ सं.क., दि. ०४/१०/२०१६)

(क) मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.६०६/१९९३ भारत सरकार विरुध्द एम.एस.गिल याप्रकरणी दिनांक २१/०९/२००० रोजी दिलेल्या निर्णयानुसार, निवडणुकीच्या कामामध्ये निष्काळजीपणा अथवा कुचराई करणाऱ्या अधिकारी / कर्मचा-यांविरुध्द निलंबनासह प्रशासकीय कारवाई करण्याचे अधिकार (राज्य निवडणुक आयोगाचे आदेश क्र.रानिआ-२००६/प्र.क्र.१४/का.५, दि.०२/०८/२००६ व भारत निवडणूक आयोगाचे आदेश क्र.४/२००१/जेएस-२, दि.०७/०२/२००१)

२२. **राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक :-**

राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील दुरध्वनी क्रमांक तसेच ई-मेल पुढीलप्रमाणे आहेत :-

फॅक्स क्रमांक :- ०२२-२२८४६७२१

दूरध्वनी क्रमांक :-०२२- २२०४५०७५ / २२०२७७३७/ २२८४६७२०

ई-मेल :-sec.mh@gov.in

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि.ज.वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२

२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
त्यांना कळविण्यात येते की, जिल्हा पोलिस अधिक्षकांना आवश्यकतेनुसार पोलिस दल, जिल्हाधिकाऱ्यांना उपलब्धकरुन देण्याच्या सूचना द्याव्यात.

३) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.

४) प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम इमारत, मर्झबान पथ, मुंबई-१
त्यांना कळविण्यात येते की, ग्रामीण निवडणुकीसाठी आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीचा विचार करुन त्यांना तात्काळ मंजूर करावे.

६) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

७) सर्व विभागीय आयुक्त

८) जिल्हा पोलिस अधीक्षक,रायगड, रत्नागिरी,सिंधुदुर्ग, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर,नाशिक, जळगाव, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, चंदपूर व गडचिरोली

९) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई-४
त्यांना कळविण्यात येते की, निवडणुकांच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक साधनसामग्री विनाविलंब पुरविण्यात यावी.

१०) सहाय्यक आयुक्त, (संगणक कक्ष),
त्यांना कळविण्यात येते की, संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून ई.व्ही.एम., पेपर सील, पट्टी सील, स्पेशल टॅग व मार्कर पेनची मागणी प्राप्त करुन घ्यावी व आवश्यकतेनुसार त्यांना साहित्य वाटप करण्यासंदर्भातील कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्यात यावी.

११) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई

१२) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने

१३) निवड नस्ती (कार्यासन-७), राज्य निवडणूक आयोग